A. V. Education Society's
**DEGLOOR COLLEGE, DEGLOOR**
Tq. Degloor Dist. Nanded – 431717 - Maharashtra
Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
Website: www.degloorcollege.in Email: principaldcd@rediffmail.com Phone No: 02463-255074

# Report of the Activity

**Activity organised during the Academic Year -** 2016-17

1. Name of the Department : Competative Exam Guidence center
2. Title of the Activity : "oneday workshop on "career opportunities"
3. Dates / Duration : 07.03.2017
4. Venue of the Activity : Cultural Hall
5. Level of the Activity : College
6. Objectives of the Activity : 1) To prepar the students for various competitive Examinations
   2) To motivate students for opportunities in civil services
7. No. of Participants : above 100
8. Name and Signature of Coordinator : Dr. Ashok Tiparse [signature]
9. Encls. :

- Notice of the Activity
- Attendance Sheet of the Participants
- Photographs (if any)
- Any other related documents

News Paper Cutting

[signature]

**Head of the Department**

समन्वयक
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
देगलूर महाविद्यालय, देगलूर

# <u>सुचना</u>

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थांना सूचित करण्यात येते की, दि. ०७. मार्च २०१७ रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळा “करिअरच्या संधी” या विषयावर प्रा. डॉ. बबन जोगदंड ( संशोधन अधिकारी यशदा, पुणे ) यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

प्रस्तुत व्याख्यानाचा सर्व विद्यार्थांनी लाभ घ्यावा.


**स्थळ : सांस्कृतिक सभागृह**

**वेळ : सकाळी ११.०० वाजता**

प्राचार्य

देशोन्नती दिनांक :- 10/3/2017

# महाविद्यालयीन तरूणाईने नाविन्याचा शोध घ्यावा- डॉ जोगदंड



*तालुका प्रतिनिधी/ ९ मार्च*

**देगलूर** : महाविद्यालयीन युवकांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून नाविन्याचा शोध घ्यावा, असे आवाहन यशदा पुणे येथील संशोधन अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी केले.

देगलूर महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा केंद्राच्या वतीने आयोजित 'करिअरच्या संधी' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक वाकोडकर हे होते. प्रारंभी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र संयोजक डॉ. अशोक टिपरसे यांनी आपल्या प्रास्ताविकातून केंद्राद्वारे घेण्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती विषद केली.

आपल्या मार्गदर्शनात डॉ. जोगदंड म्हणाले की, व्यक्तीमत्वाचा चौफेर विकास करायचा असेल तर कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही. स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी युवकात सकारात्मक दृष्टीकोणाबरोबरच जिद्द, आत्मविश्वास व निर्धार यांची नितांत गरज आहे. ग्रंथालयाचा विद्यार्थ्यांनी पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले. अध्यक्षीय समारोप करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. अशोक वाकोडकर म्हणाले की, युवकांच्या अथक प्रयत्नातून आपल्या जीवनाची दिशा निश्चित करावी, तसेच जीवनात विकास साधत असतांना नितीमुल्यांची जपवणूक करीत आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. सूत्रसंचालन प्रा. व्यंकट कंदकुरे यांनी केले. तर आभार प्रा. सुरेश काशिंदे यांनी मानले. या प्रसंगी प्रा. डॉ.कत्तुरवार, प्रा. डॉ. रत्नाकर लक्षेटे, प्रा. डॉ. सिकंदर देसाई, प्रा. एस. एम. देबडे, प्रा. डॉ. संतोष येरावार यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थित होते.

देशोन्नती दिनांक :- 11/3/2017

# मराठी साहित्य संस्कृतीचे माहेरघर म्हणजे मराठवाडा - डॉ. देशमुख

*तालुका प्रतिनिधी / १० मार्च*

**देगलूर** : प्राचीन मराठी साहित्य संस्कृतीची पायाभरणी आणि संवर्धन खऱ्याअर्थाने गोदावरीच्या खोऱ्यात झाली असून त्या अर्थाने मराठवाडा साहित्य संस्कृतीचे माहेरघर आहे, असे प्रतिपादन पुरातत्वाचे अभ्यासक्रम डॉ. किरण देशमुख यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि देगलूर महाविद्यालय देगलूरच्या वतीने आयोजित केलेल्या कै. उत्तमराव राठोड बहिःशाल व्याख्यानमालेत ते बोलत होते. डॉ. किरण देशमुख पुढे म्हणाले की, मराठवाड्याचे कला सौंदर्य अदभुत, अतूलनीय आणि आश्चर्यचकीत करणारे आहे. वेरुळचे कैलास लेणे तर धर्मसहिष्णूतेचे उत्तम केंद्र आहे. मराठवाड्यातील स्थापत्यकला तत्वज्ञान पुढच्या पिढीपर्यंत पोहचविण्याचे महत्वाचे कार्य करते, असे सांगून मराठवाड्यातील विविध शिल्पकलेचे त्यांनी वेधक विश्लेषण केले. व्याख्यानाचा प्रारंभ प्रा. गौतम भालेकर यांच्या 'अभिर गुलाल उधळीत रंग' या भक्ती गीताने झाला. व्याख्यानमालेत उपप्राचार्य डॉ. प्रकाश कद्रेकर, उपप्राचार्य एन.एच. गोविंदवार यांची उपस्थिती होती. व्याख्यानमालेचे प्रास्ताविक प्रा. सर्जेराव रणखांब यांनी केले. तर सुत्रसंचालन डॉ.बा.रा. कत्तूरवार यांनी केले. कार्यक्रमास शहरातील नागरिक, प्राध्यापक, विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संयोजक डॉ.एल.एच. सुदाम यांनी आभार मानले.

सकाळ दिनांक :- 9/3/2017


# महाविद्यालयीन तरुणाईने नावीन्याचा शोध घ्यावा

## डॉ. बबन जोगदंड, देगलूरला स्पर्धा परिक्षेसंदर्भात कार्यक्रम

**देगलूर, ता. ८ (बातमीदार) :** महाविद्यालयीन युवकांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून नावीन्याचा शोध घ्यावा, असे आवाहन यशदा येथील संशोधन अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी केले.

देगलूर महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा केंद्राच्या वतीने आयोजित 'करिअर संधी' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अशोक वाकोडकर होते. प्रारंभी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र संयोजक डॉ. अशोक टिपरसे यांनी प्रास्ताविकातून केंद्राद्वारे घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती विषद केली.

डॉ. जोगदंड म्हणाले, की व्यक्तिमत्त्वाचा चौफेर विकास करायचा असेल तर कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही. स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी युवकात सकारात्मक दृष्टिकोनाबरोबरच जिद्द, आत्मविश्वास व निर्धार यांची नितांत गरज आहे. महाविद्यालयातील समृद्ध ग्रंथालयाचा विद्यार्थी पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले. अध्यक्षीय समारोप करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाकोडकर म्हणाले, की युवकांच्या अथक प्रयत्नातून आपल्या जीवनाची दिशा निश्चित करावी तसेच जीवनात विकास साधत असताना नीती मूल्याची जपवणूक करीत आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. प्रा. व्यंकट कंदकुरे यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. सुरेश काशिंदे यांनी आभार मानले. या प्रसंगी प्रा. डॉ. बा. रा. कत्रुरवार, प्रा. डॉ. रत्नाकर लक्षेटे, प्रा. सिकंदर देसाई, प्रा. एस. एम. देबडे, प्रा. संतोष येरावार यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.



**देगलूर : करिअर आणि संधी या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. जोगदंड.**

लोकमत दिनांक :- 12/3/2017




**मार्गदर्शन** : देगलूर महाविद्यालयात 'करिअरच्या संधी' या विषयावर पुण्याच्या यशदा केंद्रातील संशोधन अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थिनी.

# कार्यक्रमाचा अहवाल

दि. 07.03.2017

## कार्यक्रमाचे नांव : करियरच्या संधी

महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने करियरच्या संधी या विषयावर पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी चे तज्ञ मार्गदर्शक तथा संशोधन अधिकारी डॉ.बबन जोगदंड यांचे विशेष व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. आपल्या मार्गदर्शनात डॉ.बबन जोगदंड म्हणाले की, व्यक्तीमत्वाचा चौफेर विकास करायचा असेल तर कठोर परिश्रमा शिवाय पर्याय नाही.

स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी विषयाच्या ज्ञानाबरोबरच जिद्द, आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोण, दृढनिश्चय व प्रयत्नशीलता इ.मानसिक गुणांची नितांत आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगीतले. तसेच राज्य व केंद्रीय पातळीवरील विविध स्पर्धा परीक्षेचे स्वरुप, अभ्यासक्रम, परीक्षेचे स्वरुप इत्यादीची माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगीतले. तसेच त्याबरोबरच इतर व अनेक क्षेत्रातील उपलब्ध असणाऱ्या करियरच्या संधीची ओळख विद्यार्थ्यांना करुन दिली.

सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अशोक वाकोडकर हे होते. कार्यक्रमाचे प्रास्तावीक स्पर्धा परीक्षा केंद्राचे संयोजक डॉ.अशोक टिपरसे यांनी केले.सदरील कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

संयोजक

समन्वयक

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद.

देगलूर महाविद्यालय, देगलूर